# संपादकीय

कथा सांगणे आणि ऐकणे ही एक मानवी सहजप्रवृत्ती आहे. किंबहुना लहान, मोठ्या सर्वांना कथा सांगायला आणि ऐकायला आवडते. मानवाने आपले अनुभव नेहमीच गोष्टीरूपाने सांगण्याचे प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांना शतकांची नव्हे, तर हजारो वर्षांची परंपरा आहे. भाषेच्या मौखिक आणि लिखित अशा दीर्घ परंपरेतून कथेची रूपे पाहता येतात. अशा एका दीर्घ आणि समृद्ध साहित्यप्रकाराची मराठी भाषेतील परंपरा आपल्याला पाहावयाची आहे. विशेषत: त्यातील समकालीन कथेचा विचार करावयाचा आहे.

**कथेचे स्वरूप आणि संकल्पना :**

मराठी कथा गोष्ट, कहाणी, कथा, लघुकथा, नवकथा, साठोत्तरी कथा अशा क्रमाने विकसित झाली. कथेचे अनुभवविश्व समृद्ध आहे. कथेला कोणताही विषय वर्ज्य नाही. अंतर्मन-बाह्यविश्व, व्यक्ती-समाज, निसर्ग-महानगर असे अनेकविध विषय कथेने आविष्कृत केले आहेत. थोडक्यात भाषा, शैली, तंत्र, ज्ञानव्यवहार यांना मुरवत कथा या साहित्यप्रकाराचा विकास झाला आहे. त्यामुळे कथेचे स्वरूप हे व्यामिश्र झाले आहे.

कथा म्हणजे काय? याचे संकल्पनात्मक उत्तर अभ्यासकांनी दिले आहे. कथा म्हणजे :

१. एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्पर संबंधांतून घडलेल्या घटनांचे एका

दृष्टिकोनातून केलेले चित्रण म्हणजे लघुकथा (मराठी विश्वकोश, खंड-३, पृ. २५५)

२. कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिकत म्हणजे लघुकथा होय. - ना.सी. फडके. (मराठी वाङ्मय कोश, खंड-४)

३. The short story to achieve a certain unique or single effect in which every word and action contributes to one pre-established design. - एडगर ॲलन पो.

४. एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा. - इंदुमती शेवडे.

५. कुशल चित्रकार कुंचल्याच्या चार दोन फटकाऱ्यांत संपूर्ण चित्र तयार करतो. तसेच या लघुकथा प्रकाराचेही आहे. - वा.ना.देशपांडे

सामान्यत: या व्याख्यांमधून कथा या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये लक्षात येतात. या पार्श्वभूमीवर अभ्यासकांनी कथेविषयी मांडलेल्या मतांचा परामर्श घेता येईल.

१. कथेचे लघुरूप व तिच्या संस्कारांची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत, काही विशेष स्वभावत:च येतात. एक केंद्रितता, मितव्यय, संक्षेप, संपृक्तता, काटेकोर नेमकेपणा हे कथेच्या कलातंत्राचे खास विशेष म्हणता येतील. अनुभवार्थ, आशयसूत्र, कथानक, पात्र, वातावरण, निवेदन आणि भाषा अशी घटक अंगे मिळून कथात्मक साहित्याची समष्टी घडत असते.

(प्रा. सुधा जोशी, कथा : संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन)

२. लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा, एकसुरी आशयसूत्रांतून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे. (भालचंद्र नेमाडे, टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन)

३. स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कथेचे अस्तित्व अबाधित आहे. तिची पृथगात्मकता कायम राहिली आहे. एक पृथगात्म वाङ्मयप्रकार म्हणून तिची दोन व्यवच्छेदक लक्षणे सांगता येतील. एक तिच्यातील अनुभवातील पृथगात्मक एकजिनसीपणा, एकरूप विविधता आणि दुसरे या गुणांशी संलग्न असलेले तिचे एक-संस्कारित्व. - इंदुमती शेवडे

**कथेचे घटक :**

'कथानक' हा कथेचा मुख्य घटक आहे. कथेमध्ये कल्पित-वास्तव विश्‍व निर्माण होत असते. हे विश्‍व विशिष्ट पद्धतीने कथन केले जाते. गोष्टीमध्ये घटना-प्रसंग हे कालानुक्रमे सांगितलेले असतात, तर कथेतील घटना-प्रसंग हे कालानुक्रमाबरोबर कार्यकारणभावाने परस्परांशी गुंफलेले असतात. म्हणून कालानुक्रम आणि कार्यकारणभावाने घटना, प्रसंगांची केलेली गुंफण म्हणजे कथानक होय. कादंबरीच्या तुलनेत कथेच्या कथानकाचा आवाका छोटा असतो. कथानकातील विषय, आशय, मूल्यविचार, समाजभान यांनाही महत्त्व असते.

'व्यक्तिचित्रण' हाही कथेचा महत्त्वाचा घटक आहे. प्रत्यक्षातील व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा कथानकात असते, या प्रतिमेला पात्र असे म्हणतात. ही पात्रे प्रत्यक्षातील माणसाप्रमाणे असतात. कथानकात विशिष्ट कृती करण्यासाठी पात्रयोजना केली जाते. निवेदन आणि वर्णन यातून कथेमध्ये व्यक्तिचित्रण केले जाते. अशा व्यक्तिचित्रणातून कथेमध्ये पात्र जिवंत करणे, हे महत्त्वाचे ठरत असते.

'वातावरण' हा कथेच्या संरचनेचा एक घटक आहे. कथानक हे स्थलकालाच्या अवकाशामध्ये घडत असते. हे अवकाश वास्तव-कल्पित असते. या अवकाशाच्या पार्श्‍वभूमीवर पात्र, घटना-प्रसंग घडत जातात. चित्रकार हा चित्र काढण्यासाठी जसा कागद या पार्श्‍वभूमीचा वापर करतो. तसा निवेदक हा कथेमध्ये निवेदन आणि वर्णनातून स्थलकालाचा अवकाश निर्माण करीत असतो. त्यामुळे कथेमध्ये, 'फार फार वर्षांपूर्वीचा काळ होता. एक होता...' अशा निवेदनातून भूतकाळाचे वातावरण तयार होऊ लागते. एखाद्या रणसंग्रामाच्या वर्णनात तलवारींचा खणखणाट येऊ लागला की, ऐतिहासिक वातावरण तयार होऊ लागते.

कथा निर्मितीमध्ये 'लेखकाचा दृष्टिकोन' या घटकाला महत्त्व असते. कथेतील घटनांमागे पात्रांचे विविध प्रकारचे हेतू दडलेले असतात. या घटनांमागे लेखकाची जीवनसरणी व मूल्यप्रणाली उभी असते. कथेतील शब्दार्थमय कहाणी निवेदक पात्रांकडून सांगितली जाते. या निवेदक पात्रांची एक जीवनदृष्टी असते. या जीवनदृष्टी व कथा हेतूमागे लेखकाची व्यापक भूमिका असते. लेखक हा कलावंत असल्यामुळे जीवनात घडणाऱ्या घटना, प्रसंगांचा त्याच्या मनावर खोल परिणाम होतो. त्यामुळे त्याच्या मनात काही प्रतिक्रिया तयार होतात. या प्रतिक्रियांना नैतिकतेचा आधार असतो. यातून लेखकाचा विशिष्ट दृष्टिकोन दिसून येतो. कथानकामध्ये विशिष्ट घटना, प्रसंगांची निवड करून त्यांची विशिष्ट दृष्टिकोनाने जुळणी करून लेखक

कथेला कलात्मकता आणि कथनात्मकता प्राप्त करून देतो.

'निवेदन' हा कथेचा महत्त्वाचा घटक आहे. निवेदन, कथन हे शब्द एकमेकांचे पर्यायी शब्द आहेत. कथा सांगणारा कुणीतरी असावा लागतो, त्याला निवेदक म्हणतात. हा निवेदक जे सांगतो, ते कथन, निवेदन होय. येथे सांगणे आणि कथन, निवेदन यांच्यामध्ये काही साम्य-भेद आहेत. कथन, निवेदनामागे लेखकाचा कलाहेतू, मूल्यभाव असतो. निवेदकाच्या निवेदनातून कथानक साकार होत असते. निवेदक हा विशिष्ट पद्धतीने घटनाप्रसंगाचे निवेदन करीत असतो. लेखकाचा कलाहेतू, मूल्यभावामुळे कथानकाच्या प्रारंभ आणि शेवटामध्ये अर्थपूर्ण नाते निर्माण होत असते. कथेमध्ये प्रथमपुरुषी आणि तृतीयपुरुषी निवेदक असतो. हा निवेदक वाचकापुढे कथानक उलगडत नेत असतो.

'भाषा' हा कथेचा महत्त्वाचा घटक आहे. कथेची संहिता भाषेतून उलगडत जाते. कथेमध्ये भाषा दोन प्रकारचे काम करते. लेखकाच्या मनातील आशय वाचकापर्यंत पोहोचविते तसेच ती कथेमध्ये सौंदर्य निर्माण करीत असते. म्हणून कथेतील निवेदन, वर्णन, संवाद यासाठी भाषेची अर्थपूर्ण, सौंदर्यपूर्ण आणि प्रवाही योजना केली जाते. थोडक्यात पात्रे, घटना-प्रसंग, वातावरण-निर्मिती, निवेदन, भाषाशैली आदी घटकांच्या एकात्म संरचनेतून कथा निर्माण होत असते.

**कथेचे उपप्रकार :**

मध्ययुगीन काळातील व लोकवाङ्‌मयातील लोककथा आधुनिक काळात बऱ्याच अंशी बदललेली दिसते. आधुनिक काळातील मराठी कथेच्या वैविध्यपूर्ण रूपवैशिष्ट्यांमुळे तिचे अनेक प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

विषयानुसार वर्गीकरण करताना कथेचे ऐतिहासिक कथा, पौराणिक कथा, अद्भुतरम्य कथा, सामाजिक कथा, विज्ञानकथा असे प्रकार मानले आहेत. कालौघात कथेचे स्वरूप बदलत गेले. स्वरूपावरून कथेचे स्फुट गोष्ट, लघुकथा, रूपक कथा, दीर्घकथा आणि अलक (अति लघुकथा) असे वर्गीकरण केले आहे. तर कथेच्या आशयाच्या अनुरोधाने कथेचे गूढकथा, भयकथा, रहस्य कथा, कौटुंबिक कथा, विनोदीकथा, नीतिकथा, बोधकथा असे वर्गीकरण केले आहे.

साठोत्तरी कालखंडात आपल्याकडे विविध साहित्यप्रवाह उदयाला आल्यानंतर त्या त्या प्रवाहांचे तत्त्वज्ञान आणि वैशिष्ट्ये स्वीकारून कथालेखन केल्यामुळे ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी असे वर्गीकरण केले जाते.

## मराठी कथेची वाटचाल :

माणसाने आपले अनुभव व कल्पना इतरांना सांगण्यासाठी कथा वाङ्मय-प्रकारचा अवलंब केला आहे. गोष्ट, कहाणी अशा प्रकारातून मराठी कथेचे प्रारंभीचे रूप पाहावयाला मिळते. त्यानंतर आधुनिक काळामध्ये १८९० मध्ये 'करमणूक' या नियतकालिकाच्या माध्यमातून कथेला स्वत:चा चेहरा गवसला. हरिभाऊ आपटे यांनी अद्भुतात रमणाऱ्या कथेला स्फुट गोष्टी या प्रकारातून वास्तवात आणले. या काळातील स्फुट गोष्टींचे घटना प्रधानता, भावोत्कटता, वास्तवता, बोधप्रधान दृष्टिकोण हे ठळक विशेष होते. या स्फुट गोष्टीने आपल्या अवतीभवतीच्या समाजातील व्यक्तींच्या सुख दु:खाचे चित्रण केले. आशय आणि अभिव्यक्तीच्यादृष्टीने हरिभाऊ आपटे यांनी मराठी कथेला वेगळे वळण लावले. त्यामुळे आधुनिक मराठी कथेला विशिष्ट आकार प्राप्त झाला.

यानंतर १९१० ते १९२६ 'मनोरंजन' या नियतकालिकाच्या काळातील कथेने वाचकांना बोध करण्यापेक्षा, त्यांचे मनोरंजन करण्याकडे अधिक लक्ष दिले. करमणुकीतल्या कथांप्रमाणेच मनोरंजनमधील संपूर्ण गोष्टी अघळपघळ व पाल्हाळीक असल्या, तरी त्या वाचकाला उद्देशून भाष्य करणाऱ्या आहेत. या काळात वि.सी.गुर्जर, दिवाकर कृष्ण, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी गोखले आदींनी मराठी कथेला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिले. या कथेने आत्महत्या, मृत्यू, अपघात, प्रेम, कलह, द्वेष, बालविधवांचे प्रश्न, सासुरवास, दारूचे व्यसन, पुनर्विवाह, ब्रह्मचर्य आदी विषयांतून स्वप्नरंजनाबरोबरच मनातील आंदोलने टिपली. आशय व अभिव्यक्तीची समृद्धता, विविध निवेदन पद्धतींचा वापर, घटना प्रधानता ही या कालखंडातील कथेची ठळक वैशिष्ट्ये ठरली. या काळातील कथाकार हे चमत्कृती व रहस्यप्रधानतेच्या आहारी गेल्याने या कथांमध्ये अवास्तवता व अतिरंजितपणा अधिक प्रमाणात आला. ही कथा मध्यमवर्गीयांभोवतीच रेंगाळत राहिली. पाश्चात्त्य व अन्य भाषीय कथाबीजे घेऊन कथेला महाराष्ट्रीयन पेहराव चढविण्याचाही प्रयत्न या काळात झाला. परिणामी या कथेतील जीवनदर्शन हे जुजबी आणि उथळ झाले. थोडक्यात, असे असले तरी आजच्या लघुकथा व नवकथेच्या पायाभरणीचे काम स्फुट गोष्टी व संपूर्ण गोष्टींनी केलेले दिसते.

१९२६-१९४४ या 'यशवंत-किर्लोस्कर' कालखंडातील लघुकथेने आधुनिक वळण स्वीकारले. कथेच्या वाटचालीतील हा कालखंड उत्कर्षाचा मानला जातो. विस्कळीतपणा व पाल्हाळीकता जाऊन कथा अधिकाधिक रेखीव झाली. मनातील

भावनांची आंदोलने टिपणारी ही कथा जीवनाच्या विविध अंगांतून संचार करू लागली. उत्कट अनुभूती, मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवन, सूक्ष्म मनोविश्लेषण, तात्त्विक चिंतनशीलता, कलात्मकता, वास्तवता, स्वभाव प्रधानता, रसाविष्कार, मूल्यजपणूक, भाषाविकास, कल्पनाविलास, वातावरण निर्मितीचे कौशल्य, अद्‌भुतरम्यता, व्यक्तिचित्रणात्मकता, प्रादेशिकता, विनोद-परता, आंतरिक संघर्ष, विषमता, स्त्री जीवनातील समस्या, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय प्रश्नांची चर्चा ही या कालखंडातील कथांची विषयसूत्रे होती. दिवाकर कृष्ण यांनी कथा हा स्वतंत्र अस्तित्व असलेला कलाप्रकार असल्याची जाणीव करून देत लघुकथेला नवे वळण लावले. त्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घालण्याचे कार्य ना.सी.फडके आणि वि.स.खांडेकर यांनी केले. तंत्रशुद्धतेत कथेला बसवताना फडके यांनी आकर्षक प्रारंभ, कथेच्या मध्यावर गुंतागुंत, निरगाठ आणि शेवटी विस्मय व उत्कंठा जागृत ठेवून केलेली परिणामकारक उकल यावर भर दिला. खांडेकरांच्या कथांनी सामाजिक जाणिवा आणि जीवनदर्शनावर भर दिलेला आहे. याशिवाय य.गो.जोशी, वि.वि.बोकील, अनंत काणेकर, लक्ष्मणराव सरदेसाई, भा.वि.वरेरकर, कुमार रघुवीर आदींनी लघुकथेला अधिक समृद्ध केले. थोडक्यात, आपल्या जगण्याशी, अनुभवांशी आणि विचारांशी प्रामाणिक राहणाऱ्या लेखकांनीच या काळात कथेला खऱ्या अर्थाने समृद्ध केले.

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्याचा प्रभाव मानवी जीवनावर पडला. त्यामुळे १९४४ पर्यंत लघुकथेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. १९४५ च्या सुमारास व त्यानंतर नवकथेच्या रूपाने कथा वाङ्मयात विलक्षण क्रांती घडली. ही क्रांती आशय, आविष्कार, रूढतंत्र, वाङ्मयीन संकेत या संदर्भात होती. या नवकथेने चित्रणविषयांत नावीन्य आणत माणसाच्या मनातील काळी व विकृत बाजू ठळक करून दाखविली. नव्या लघुकथांतून जीवनाचे अधिक वास्तव, सूक्ष्म आणि विविध पातळ्यांवरून दर्शन होऊ लागले. मनोविश्लेषणाचे नवदर्शन, चिंतनशीलता, अंतर्मुखता, कथानकातील स्वैरता व लवचीकता, असामान्याचे आकर्षण, कारागिरीपेक्षा कलानिर्मिती, परमन प्रवेश, व्यक्तिदर्शनाचे नवतंत्र, मध्यमवर्गीय जीवनदर्शन, अंतर्मनातील विरोधाचे चित्रण, आशय आणि अभिव्यक्तीतील आमूलाग्र बदल ही या काळातील कथांची वैशिष्ट्ये होत. या नवकथेच्या संदर्भात प्रा. गंगाधर गाडगीळ लिहितात, ''नवकथेच्या लेखकांनी कलेच्या क्षेत्रात अनेक संकेत झुगारून दिले. हेच तिचे मोठे वैशिष्ट्य

आहे. तत्पूर्वी मराठी साहित्यात संकेतांचा नुसता बुजबुजाट झालेला होता म्हणून हे वैशिष्ट्य अधिक मोलाचे वाटते. पण खरे म्हटले, तर नवकथा ही दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या बदलांची निदर्शक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर समाज जीवनात, परिस्थितीत बदल झाले. जीवन धारणांत बदल झाले. मूल्यांच्या स्वीकारात बदल झाले. यंत्रयुगाने तळापासून बदललेल्या समाजव्यवस्थेत जी सर्व क्षेत्रांत पडझड झाली; त्या पडझडीला मिळालेला शब्द म्हणजे नवकथा होय.'' थोडक्यात युद्धोत्तर समाजवास्तव नवकथेत चित्रित झालेले दिसते.

या कालखंडात 'अभिरुची' आणि 'सत्यकथा' मासिकांनी कथेला वाचकाभिमुख केले. त्यामुळे या कालखंडास 'अभिरुची आणि सत्यकथा कालखंड' संबोधले गेले. वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगूळकर यांनी या काळात मराठी कथेला नवे वळण लावले. तंत्र आणि रूढ निवेदनपद्धतीच्या चाकोरीतून कथेला मुक्त केले. कथाकारांच्या आस्थेचे केंद्र व्यक्ती बनल्याने जीवनातील विदारक सत्याची ओळख झाली. व्यक्तिसंदर्भात सामाजिक जाणिवा आणि जीवनमूल्ये रंगविली जाऊ लागली. त्याचकाळात दि.बा. मोकाशी, सदानंद रेगे यांच्या कथा वास्तवता, तरलता, सूचकता व काव्यात्मता यामुळे उंची गाठताना दिसतात. शांताराम (के. ज. पुरोहित) यांच्या व्यक्तिचित्रणांची सूक्ष्मता, भावनेची तरलता आणि आविष्काराचा हळुवारपणा नजरेत भरतो. विद्याधर पुंडलिक यांची कथा घटना व भावना यांच्या नाजुक घाट विणते. जी. ए. कुलकर्णी जीवनाच्या विदारक सत्याचा शोध घेताना मनोविश्लेषणाच्या सूक्ष्मतेतून भावना व आंतरिक संवेदनांचे पदर उलगडतात. याशिवाय चि. त्र्यं. खानोलकर, जयवंत दळवी, वि. शं. पारगावकर, शरदचंद्र चिरमुले, श्री. दा. पानवलकर आदींच्या कथा लक्षवेधी ठरल्या. या कालखंडातील दलित कथालेखनामागे जगलेले, भोगलेले जीवन प्रांजळपणे मांडणे ही भूमिका स्पष्टपणे जाणवते. ना. रा. शेंडे, मा. सो. कांबळे, न. द. थोरात आदी कथाकारांनी हिंदू समाजाच्या रूढी, परंपरा आणि त्यात भरडले जाणारे दलितांचे जीवन, गुलामगिरी, जातिविषमता व दारिद्र्याचे वास्तव चित्रण केलेले आहे. या काळात ग्रामीण संवेदनशीलतेतून ग्रामीण व प्रादेशिक कथा मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेल्या. निसर्गाची नानाविध रूपे, ग्रामजीवनातील दैन्य, दारिद्र्य, सोशिकता, उपेक्षितांचे जीवन वास्तव, ग्रामीण समाज व माणसांचे स्वतंत्रपण, जीवन संघर्ष, जगण्यातले कारुण्य, वंचितांची बंडखोरी व लढे, निजामी राजवटीचे परिणाम, सीमावर्ती भागाचे

प्रश्न, ग्रामीण स्त्रीजीवन, कौटुंबिक ताणेबाणे, ग्रामीण माणसाचे मनोवास्तव आदी विषय घेऊन ग्रामीण जीवन आणि त्यातील गुंतागुंत उकलण्याचे कार्य या कथेने केलेले दिसते. व्यंकटेश माडगूळकरांची कथा ग्रामीण वास्तव मांडू लागली. श्री. म. माटे यांनी जीवंत अनुभूती, कसदार भाषा आणि उपेक्षितांबद्दलचा जिव्हाळा ग्रामीण कथेत आणला. श्री. म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनाचा प्रामाणिक व वास्तव अविष्कार आपल्या कथातून केला. शंकर पाटलांची कथा व्यक्तिमनातील भावसंघर्षाला संवादी बनवत राहिली. उद्धव शेळके यांनी वैदर्भीय व्यक्ती आणि परिस्थिती यांचा समन्वय आपल्या कथेत साधला. याशिवाय द.मा. मिरासदार, लक्ष्मणराव सरदेसाई, वि. स. सुखटणकर, बी. रघुनाथ, र. वा. दिघे, ग.ल. ठोकळ, महादेव मोरे, मधु मंगेश कर्णिक, अण्णाभाऊ साठे आदींच्या कथा विविध प्रदेशचित्रण व भिन्न प्रकृतीमुळे वाचकप्रिय ठरल्या.

१९६० नंतर मराठी साहित्यातून येणाऱ्या परिवर्तनातून ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, कामगार आदी साहित्य प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांनी स्वत:चे तात्त्विक अधिष्ठान स्वीकारून चळवळीतून साहित्यनिर्मिती केली. या प्रवाहांच्या मुळाशी जीवन संघर्ष होता. सभोवतालची परिस्थिती, आचार-विचार, जीवनशैली, समाजाच्या गरजा, सुख-दु:खविषयक कल्पना, दैनंदिन प्रश्न यांना साद-प्रतिसाद देत नवशिक्षित, ग्रामीण व उपेक्षित वर्गातील तरुण कथालेखन करू लागले. १९६० नंतर ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिक जोरकस झाला. खेड्यातील शोषित, विस्थापित माणसांच्या जीवनजाणिवा ठळकपणे व्यक्त करण्यासाठी ग्रामीण साहित्याची चळवळ जन्माला आली. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागले. या लेखनाला प्रत्यक्ष अनुभवांचे पाठबळ लाभले. हे लेखन वर्णनपर व कथनात्मक होते. या कथेतून ग्रामीण माणसाचे, कष्टकऱ्यांचे दु:ख व जीवनभोग, ग्रामजीवनातील परिवर्तने व परंपरा, ग्रामपरिघाबाहेरचे जग, शोषणव्यवस्था आदींचे चित्रण होऊ लागले. या ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण लेखकांना समाजभान आले. त्यामुळे या काळात दैववादात, मनोरंजनात, दु:ख वर्णनात अडकलेली ग्रामीण कथा वास्तव जीवनचित्रण करू लागली. व्यवस्थेला प्रश्न विचारू लागली. वरील सर्व कथाकारांबरोबर रा. रं. बोराडे, रणजित देसाई, आनंद यादव, भास्कर चंदनशिव, चारुता सागर आदींच्या कथांनी मराठी ग्रामीण कथा अधिक परिपुष्ट व समृद्ध केलेली पाहावयास मिळते.

१९६० नंतरची दलित कथा आत्मशोध घेणारी, मानसिक स्वातंत्र्याचा

उद्‌गार व्यक्त करणारी आहे. आशय व अनुभवसंपन्नता ही तिची प्रवृत्ती आहे. या कथेमागे गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवता, संघर्ष, वेदना, विद्रोह, नकार या मूल्यधारेला दलित कथेने आपलेसे केले. शोषणाचे विविध संदर्भ, धर्मांतर, विद्यापीठ नामांतर, राखीव जागा, निवडणुकीचे राजकारण, दलित जीवनाचे खोल दर्शन, दाहक वास्तव, उच्च-नीचता, दलितांच्या जीवनातील संघर्ष हे विषय या कथांच्या केंद्रस्थानी आहेत. अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, वामन होवाळ, अर्जुन डांगळे, योगेंद्र मेश्राम, योगिराज वाघमारे, भीमराव शिरवाळे, अमिताभ, माधव कोंडविलकर, सुखराम हिवराळे, अविनाश डोळस, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, भीमसेन देठे, रविचंद्र हडसनकर, एकनाथ सोनवणे आदींच्या कथांनी हे दालन समृद्ध केले आहे.

लिंगाधिष्ठित विषमता, स्त्रीशोषणावर आधारलेली पुरुषप्रधान संरचना यांचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. प्राचीन काळापासून बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवांचा अमानुष छळ, सतीची चाल, भोगदासी अशा अमानुष चालीरीतींची स्त्री बळी ठरलेली आहे. १९५०-१९६० पर्यंत स्त्रीचे आयुष्य हे शोषितांचे होते. स्त्रीशिक्षणाला गती मिळूनही सामान्य स्त्री स्वत:वरच्या अन्यायाने पेटून उठली नाही. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान नागरिक दर्जा व संधीच्या समानतेची ग्वाही दिली. स्त्रियांसाठी अनेक कायदे आणि सेवेच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामधून स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व सापडत गेले. १९७५ 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले गेले. त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री जागृती झाली. त्यानंतर आपल्याकडे स्त्रीवादी चळवळी सुरू झाल्या. या स्त्रीवादी चळवळीची सांस्कृतिक आघाडी म्हणून मग स्त्री प्रश्नांची चर्चा करणारे साहित्य निर्माण झाले. या कालखंडात शैलजा राजे, योगिनी जोगळेकर, शकुंतला गोगटे, कुसुम अभ्यंकर, स्नेहलता दसनूरकर, कुमुदिनी रांगणेकर, नयना आचार्य, सुमती क्षेत्रमाडे, ज्योत्स्ना देवधर, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, तारा वनारसे, प्रतिमा इंगोले, माधवी देसाई, उर्मिला पवार, मेघना पेठे आदी स्त्री लेखिकांनी कथालेखन केले. त्यांनी आपल्या कथेतून समाजातील अन्याय्यरूढी, स्त्रीची घुसमट, व्यक्ति-स्वातंत्र्य, मानवी अस्तित्वाची अर्थशून्यता, लैंगिकता, स्त्रीवादाची जाणीव, जीवनविषयक मूलभूत

प्रश्न, नातेसंबंधातील गुंतागुंत, मानसिक ताण- तणाव, स्त्री-शक्तीची जाणीव, पुरुषी आकर्षण आदी विषयांतून मराठी कथेचा आशय आणि आविष्कार समृद्ध होत गेला.

१९७५ नंतरच्या विनोदी कथेतून आधुनिक जीवनपद्धती, भ्रष्ट राजकारण, नवी प्रसारमाध्यमे व तंत्रज्ञानाशी सामना करणारी माणसे, नव्या ग्रामीण पिढीची घुसमट, नात्यांतील गुंतागुंत, शहरी उच्चभ्रूंचे जीवन, लग्नातील गंमतीजंमती आदी विषय प्रभावीपणे आले. याकाळात भा. ल. महाबळ, वसंत मिरासदार, अनिल सोनार, बा.भ. पाटील, प्रभाकर ताम्हाणे, विजय कापडी, चंद्रकांत महामिने, व.बा. बोधे, श्रीकांत मुंदरगी, मुकुंद टाकसाळे, इंद्रायणी सावकार, मंगला गोडबोले, दीपा गोवारीकर, संजय कळमकर आदींनी हे कथाविश्व समृद्ध केले आहे.

मराठी कथासाहित्यात आदिवासी कथांचे प्रमाण अल्पस्वल्प असेच आहे. पारंपरिक आदिवासी जीवन व त्यांचे मूक रुदन, त्यांचे जीवन, अज्ञान, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, निसर्गप्रेम, अन्याय, अत्याचार, वेठबिगारी, कर्ज-बाजारीपण, जातपंचायत, बलात्कार, शोषण, सेवात्याग, सावकारी पाश आदी विषय घेऊन पंढरीनाथ तामोरे, जयवंत वैती, उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, बाबाराव मडावी आदी लेखकांनी हे कथाविश्व उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

१९९० नंतर खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाने भारतीय समाजजीवनात बरेच बदल झाले. माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट, वस्तूंचे- सेवांचे, जीवनपद्धतींचे, सांस्कृतिक जीवन संचिताचे बाजारीकरण होऊ लागले. सामान्य माणसाची जीवनशैली बदलली. त्याच्या वैचारिक निष्ठा बोथट झाल्या. व्यक्तिगत सुख, चंगळवाद याला अधिक महत्त्व आले. अतिरेकी स्वातंत्र्य, मूल्यांची घसरण, ढासळलेली कुटुंबव्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते प्राबल्य, आधुनिक भांडवलशाही, नवतंत्रज्ञानाचा युवा वर्गावरील परिणाम, व्यक्तिकेंद्रितता यामुळे समाजजीवन प्रभावित झाले.

या काळातील ग्रामीण कथेत माणसांचे होणारे आधुनिकीकरण, शोषित वर्गाची दयनीय स्थिती, लैंगिक शोषण, सत्ता व कामवासना, वास्तव जगणे व संघर्ष, राजकीय पिळवणूक, कौटुंबिक कलह, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी व जागतिकीकरणाने निर्माण केलेले सर्वच क्षेत्रातील प्रश्न यांचे दर्शन घडते. आजची ही कथा चाकोरीबाहेरील जगणेदेखील मांडत आहे. चंद्रकुमार नलगे, श्रीराम गुंदेकर,

नागनाथ कोत्तापल्ले, बाबाराव मुसळे, आनंद पाटील, लक्ष्मीकांत देशमुख, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, आसाराम लोमटे, सचिन वसंत पाटील, किरण गुरव, प्रभाकर हरकळ आदींच्या कथांतून हे विषय ठळकपणे पुढे येतात.

दलित कथेतून महानगरीय संवेदना, मुक्त अर्थव्यवस्था, चंगळवाद, मध्यम वर्गाची ससेहोलपट, व्यवहारवादी व भौतिकवादी नव मानसिकता, मूलभूत हक्क व कायद्याची जाणीव, बुद्ध संस्कृती, माणसाचे हरवलेपण आदींचे चित्रण प्रत्ययकारीपणे आलेले दिसते. जयंत पवार, प्रकाश खरात, जयराज खुणे, दीपध्वज कोसादे, गौतमीपुत्र कांबळे, प्रज्ञा पवार आदी लेखक, लेखिका ही कथा समृद्ध करीत आहेत. याशिवाय भारत सासणे, मिलिंद बोकील, राजेंद्र मलोसे, अभिराम भडकमकर, समर खडस, बालाजी सुतार, सतीश तांबे, प्रतिमा जोशी आदी कथाकार वेगवेगळे विषय व जाणिवांनी मराठी कथा समृद्ध करीत आहेत.

थोडक्यात, १९९० नंतरची कथा समकालीन गतिमान, दुभंगलेले व व्यामिश्र जीवन, सर्वव्यापी राजकारण, शोषणाच्या नव्या रीती, अस्तित्व संघर्ष, बदलते वर्तमान, माणूसपण, भूमिहीन शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना, जगण्यातले पेच, महानगरीय जगातील हिंसा, क्रौर्य, मानवी नातेसंबंधांतील ताण-तणाव आदी विषय कवेत घेऊन गतिमान होत आहे.

**समकालीन साहित्य :**

समकालीन या शब्दातून काळाचा निर्देश होतो. हे साहित्य आपल्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगते. या काळातील घटना, स्थिती, वृत्ती-प्रवृत्ती यांचे आकलन करून काळाच्या गाभ्याशी जाऊन भिडते. या काळातील मानवी भावभावना, प्रश्न, जीवन-जाणिवा यांचे प्रभावी दर्शन अशा साहित्यातून होते. मदन कुलकर्णी म्हणतात, ''आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवन-जाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केलेले असते, ते साहित्य समकालीन साहित्य ठरेल.'' (समकालीन साहित्य, मदन कुलकर्णी, समाविष्ट साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, संपादक डॉ. शरणकुमार लिंबाळे). वसंत आबाजी डहाके हे काळाला विशेष महत्त्व देऊन समकालीनतेची व्याख्या करतात. ते म्हणतात, ''समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य.'' (नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य, प्रा. वसंत

आबाजी डहाके, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक)

स्वातंत्र्योत्तर कालखंड हा प्रचंड उलथापालथीचा होता. १९४५ नंतर सभोवतालच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील अनुभव, दुसरे महायुद्ध, भांडवलशाही व साम्राज्यवादाचे दुष्परिणाम, मूल्यांचा ऱ्हास, यंत्र व विज्ञानाचे परिणाम, पाश्चात्त्य संस्कृतीचा परिचय यांमुळे समाज-जीवनात आमूलाग्र बदल झाला. या नवजाणिवांचे चित्रण अत्यंत संवेदन-शीलतेने नवसाहित्यातून होऊ लागले. त्यानंतर मराठी कथा, कादंबरी, कविता, नाटक या सर्वच साहित्यप्रकारांत या नवीनतेचे व आधुनिकतेचे लक्षणीय दर्शन घडू लागले. आजही ते तितकेच प्रत्ययकारीपणे घडते आहे, ही आश्वासक बाब आहे.

या पार्श्वभूमीवर 'समकालीन मराठी कथा' या संपादित कथासंग्रहातील कथा या समकालीन जीवनानुभव प्रकट करणाऱ्या आहेत. समकालीनतेच्या सूत्रातील कथांची गुंफण एकरंगी होऊ नये, म्हणून ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, ग्रामीण-महानगरीय, विनोदी अशा प्रवाहातील काही निवडक कथा निवडल्या आहेत. त्यामधून विद्यार्थ्यांना समकालीन मराठी कथेची ओळख व्हावी, असा हेतू आहे.

**निवडक समकालीन कथा :**

बाबुराव बागूल हे मराठीतील श्रेष्ठ कथाकार आहेत. त्यांचा १९६३ मध्ये 'जेव्हा मी जात चोरली होती!' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. मानवी दु:खाचे कारण जातिव्यवस्था हेच असते, याचे भान ही कथा देते. या कथेतील नायक स्वत:ची जात लपवितो. मनुवादाचा पगडा असलेले रामशरण, माताप्रसाद, रणछोड, देवजी ही पात्रे राहणीमानावरून नायकाला उच्चवर्णीय समजतात. त्याला राहायला रणछोड खोली देतो. नायक जात लपविण्यासाठी तोलून मापून बोलणे, एकांतात रमणे, स्वनिंदा करणे यांना प्राधान्य देतो. त्याच वेळी मुंबईच्या काशिनाथ सकपाळला जाती अस्पृश्यतेमुळे कामगारांशी सामना करावा लागतो. तो उग्र, रागीट पवित्रा धारण करून समूहाला आव्हान करतो. मारहाणीच्या भीतीपोटी हातात सुरा घेऊन खून करण्याची भाषा नायकाजवळ बोलून दाखवितो. उच्च-नीचतेमुळे स्फोटक, दहशतीच्या, अमानुष अशा वातावरणात कथा नाट्यरूप धारण करते. जातिभेद-द्वेष-अस्मिता, स्पृश्य-अस्पृश्यता, रामचरणची गुरुभक्ती व दानवीपणा, काशिनाथ व नायकाचा नोकरी सोडण्याचा निर्णय, खरी जात समजल्यामुळे नायकाला

झालेली मारहाण आदी घटना प्रसंगांतून ही कथा वाचकाला अस्वस्थ आणि अंतर्मुख करते, विचारप्रवण बनविते.

भास्कर चंदनशिव हे ग्रामीण चळवळीतून पुढे आलेले, १९८० नंतरच्या काळातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. शेतकऱ्याचे जीवन, त्याचे पीक-पाणी, त्यातून उभ्या राहिलेल्या समस्या यावर चंदनशिव यांची कथा भाष्य करते. त्यांची 'लाल चिखल' ही एक श्रेष्ठ कथा मानली जाते. या कथेतून किशोरवयीन शाळकरी मुलाचे भावविश्व आणि शेतमालाचे बाजारभाव या चिरपरिचित विश्वातून एक दाहक वास्तव पुढे येते. अवघ्या एक दिवसाच्या कालक्रमातून ही कथा शेतकऱ्याचे दुःख साकार करते. या कथेतील बापू हा दहावीतला मुलगा आहे. त्याचे शेतकरी आई-वडील भाजीपाला बाजारात विक्रीला आणतात. मालाची आवक अधिक झाल्याने भाव पडतात आणि सोन्यासारख्या मालाची माती होते. शेतकऱ्याला योग्य भाव न मिळाल्यामुळे आपला माल रस्त्यावर फेकून द्यावा लागतो. सोन्यासारख्या टमाट्यांचा लाल चिखल होतो. शेतकऱ्याचे कष्ट, त्याचे श्रम अश्रूंमध्ये परावर्तीत होऊन त्यांचा लाल चिखल होतो. या नित्याच्या वास्तवामागील भावनिक, व्यावहारिक सत्य ही कथा प्रभावीपणे मांडते. शेतकरी हमीभाव, दुष्काळ, सावकार, शासकीय योजना आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा वास्तवाला ही कथा अधोरेखित करते, म्हणून ती समकालीन ठरते. एक दिवसाचा कालक्रम, कमी पात्रे, मोजके घटना-प्रसंग आणि तीव्रतर होत जाणारा संघर्ष यांमुळे ही कथा वाचकाची पकड घेते.

गौरी देशपांडे यांच्या 'आहे हे असं आहे' या कथासंग्रहातील 'पाऊस आला मोठा' ही कथा आहे. सावी, तिचे विधुर वडील आणि सावत्र आई अम्मी यांच्या परस्पर नातेसंबंधांवर ही कथा आहे. अम्मी म्हणजे अमला आणि सावी म्हणजे सावित्री या दोघींच्या नात्यांतील गुंफणीतून ही कथा साकार होते. या दोघींची मानसिक स्थिती आणि घरातील परिस्थिती सारखी आहे. पण त्यांचे स्वभाव परस्परविरुद्ध आहेत. सावी ही अतिशय वस्तुनिष्ठ, तर अम्मी भावनिक आहे. अम्मीकडे व्यावहारिक शहाणपण आणि अनुभवातून आलेला समंजसपणा आहे. या दोघींचा प्रवास एकाच दिशेने घडतो. फक्त त्याचा परिणाम भिन्न होतो. विधुर वडील उतारवयात अम्मीशी विवाह करतात. त्यामुळे सावीच्या मनात वडिलांविषयी काहीसा दुरावा निर्माण होतो. वडिलांच्या कृतीचा अंदाज चुकलेल्या सावीला कथेच्या शेवटी अम्मी म्हणते, ''चुकतात आडाखे माणसाचे. सावित्री

SENIOR

अजून पुष्कळ आयुष्य आहे तुझं पुढे.'' हे वाक्य कथेला एका उंचीवर नेऊन पोहोचवते. सत्य हे कल्पनेहून भिन्न असू शकते. हे सत्य अतिशय वस्तुनिष्ठ असणाऱ्या सावीला अखेरीस उमजते, तेव्हा ती भावनिकदृष्ट्या कोलमडून पडते. जीवनातील प्रत्येक अनुभव सत्य असतो, फक्त त्याचे संदर्भ बदलतात. जीवन जगायला आवश्यक असणारे शहाणपण शिक्षणाने येते, की उपजत बुद्धीने? प्रगल्भता ही बुद्धीने येते की, विवेकाने? यांतील 'मूल्य संघर्ष' या कथेत तरलतेने अभिव्यक्त झाला आहे. या कथेवर अलीकडे 'आम्ही दोघी' नावाचा चित्रपट २०१८ मध्ये आला होता.

'उठावण' ही सदानंद देशमुख यांची कथा आहे. या कथेतून कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याची व्यथा शब्दबद्ध झाली आहे. शासनाच्यावतीने फेडरेशन मार्फत विशिष्ट मुदतीच्या आत शेतकऱ्याने कापूस विकला तर पन्नास रुपये बोनस जाहीर केला जातो. शेषराव आपला सात क्विंटल कापूस मोठी कसरत करीत विक्रीसाठी जिनिंग सेंटरला आणतो. पण नवी सरकारी चातुर्वर्ण्यव्यवस्था आडवी येते. या नव्या व्यवस्थेत पुढारी, व्यापारी, नोकरदार आणि शेतकरी आहेत. यातील वरचे तिघे, तळातील शेतकऱ्याला नागवत आहेत. नोकरदारांच्या प्रतिनिधी वॉचमन या शेतकऱ्यांना लुटू पाहतो. उशीर झाल्याचे कारण देत गेटच्या आत गाड्या घ्यायला नकार देतो. मात्र पुढाऱ्यांचे आणि व्यापाऱ्यांचे ट्रॅक्टर आत घेतो. शेषराव त्याला भजे खाऊ घालून गाडी आत घेण्याची विनंती करून बघतो. पण तो गाडीचा नंबर लावण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडे पन्नास रुपयांची मागणी करतो. त्याची ही मागणी ऐकून शेषरावचा संयम संपतो व तो वॉचमनला मारहाण करतो. त्यामध्ये इतरही शेतकरी सहभागी होतात. ग्रामीण कथेत अभावानेच आढळणारा विद्रोह या कथेत प्रकटला आहे. असे दिसून येते.

उषाकिरण आत्राम या आदिवासी साहित्याच्या प्रवाहात कथालेखन करणाऱ्या पहिल्या महिला कथाकार मानल्या जातात. त्यांचे कथालेखन १९९६ पासून सुरू आहे. त्यांच्या 'शिकार फत्ते झाली' या कथासंग्रहातील 'बाजा' ही कथा आहे. ही कथा आदिवासी जीवनावर आधारित आहे. जन्मतःच मुका असलेला बाजा, त्याची पत्नी लक्ष्मी, मुलगा पेन्टा आणि रामय्या सावकार या पात्रांतून ही कथा उलगडते. बाजा रामय्या सावकाराच्या अनन्वित अत्याचाराचा बळी ठरतो. या अत्याचाराचा प्रतिकार पेन्टा करतो. शिक्षणामुळे पेन्टाला आत्मभान येऊ लागते. म्हणून तो, ''थांब! मोठा तं होवू दे, तुले बी म्या घनचक्कर दावीनच,'' असा इशारा

देतो. या कथेतून आदिवासी, शोषित, पीडितांच्या व्यथा-वेदना व संघर्ष प्रकट होतो. भारत स्वतंत्र झाला तरी वेठबिगारीची प्रथा, शोषणाच्या तऱ्हा बदललेल्या नाहीत. अक्षरशत्रू असलेल्या आदिवासींचे पिढ्यान् पिढ्या शोषण केले जाते. त्यांच्यावर अत्याचार केले जातात, याचा प्रत्यय ही कथा देते. आदिवासींच्या जीवनाच्या वेगळ्या आणि सच्च्या अनुभव विश्वाच्या प्रत्ययामुळे ही कथा वाचकाला खिळवून ठेवते. एका वेगळ्या अनुभव विश्वाचा प्रत्यय देण्यात यशस्वी होते.

राजेंद्र मलोसे यांच्या 'महात्मा गांधी दगड दवाखाना' या कथा-संग्रहातील 'दगड दवाखाना' ही वैद्यकीय क्षेत्रातील वर्तमान वास्तवावर भाष्य करणारी कथा आहे. कथेतील निवेदक 'मी' एकाच वेळी मध्यस्थ, डॉक्टर, लेखक, नातेवाईक अशा भूमिका समर्थपणे निभावताना दिसतो. तो भीतीने ग्रासलेला आहे. कथेचे लिहिलेले तुकडे ऐकविताना ती कथा वाचावीच असा आग्रह धरतो. तसाच एखाद्या दिवशी कथा लिहायला जमले नाही, याची प्रांजळ कबुलीही देतो. निवेदनातील हा अनोखा प्रयोग वाचकाला कथाशयाकडे खेचून घेतो. कथानायक डॉ. जगदीश जेवळीकर हा अबोल, मध्यमवर्गीय, वैज्ञानिक शोभावा असा तरुण आहे. त्याच्या हृदयाची एक झडप खराब झाल्याने त्याची डॉक्टर बहीण अस्वस्थ होते. श्रीमामाच्या झडपेच्या यशस्वी ऑपरेशनची पूर्ण हकीकत सांगून निवेदक तिला दिलासा देतो. डॉ. गोपीनाथ यांच्या मदतीने जे. जे. हॉस्पिटलला जगदीशचे ऑपरेशन यशस्वी होते. काही काळानंतर जगदीशला मुतखडा झाल्याचे निदान डॉक्टर करतात. ऑपरेशनऐवजी मुंबई येथील दगड दवाखान्यात महागड्या 'लिथोटिप्सी' उपकरणाद्वारे करायचे निश्चित होते. अपॉइंटमेंट घेऊन दवाखान्यात रुग्ण दाखल केला जातो. मात्र घासाघीस करून चौदा हजारांत उपचार होईल, असे डॉ. शर्मा सांगतात. निवेदक पाच हजारांवर अडून बसतो. पंधरा दिवसानंतर निवेदक, डॉ. मित्रा, रुग्ण जगदीश पुन्हा मुंबईच्या दगड दवाखान्यात दाखल होतात. डॉ. गुप्ता दहा हजारांत उपचारासाठी तयार होतात. निवेदकाला दहा रुग्ण पाठवा, प्रत्येकामागे एक हजारचा चेक मिळेल, अशी ऑफर देतात. आदर्शवादी व लाचखोरीला भीक न घालणाऱ्या निवेदकाला ही बाब खटकते. अखेर जगदीश डॉक्टर म्हणून दहा, निवेदक डॉक्टर म्हणून नऊ, डॉ. मित्रा सोबत आहे म्हणून आठ व नाशिकच्या डॉक्टर मित्राचा फोन म्हणून सात हजारांवर सौदा निश्चित होतो. इथेही प्रत्येक डॉक्टरमागे एक हजार अशी लाच दिलेली असते. याचे शल्य निवेदकाला बोचत राहते. शेवटी डॉ. जगदीशही कमिशनचा ६०-४० फॉर्म्युला स्वीकारून मालाडमध्ये हॉस्पिटलसाठी

तीन कोटी लावतो. वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारी जगताचे विरूप व वास्तव चित्रण ही कथा करते. सत्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या म. गांधीजींच्या नावाने सुरू असलेल्या दवाखान्यात 'एक पेशंट पाठवा हजार रुपये मिळवा,' अशी अनेक भ्रष्ट तंत्रे अवलंबून रुग्णांना नाडले जाते. सेवेच्या पवित्र क्षेत्रात आदर्शवादाची, माणूसकीची, नैतिक मूल्यांची झालेली घसरण ही चिंतनीय बाब आहे, हे वास्तव कथेतून प्रत्ययकारीपणे येते. या कथेत निवेदक हा स्व-निंदेतून, तिरकस, व्यंगात्म, उपरोधिक व नर्मविनोदी शैलीतून भाष्य करतो. तपशीलाचा पसारा टाळणारी, अनलंकृत, संमिश्र अशा भाषेचा प्रभावी वापर, वास्तव अनुभूती देणारी संवादी शैली, यामुळे ही कथा मनात घर करून राहते.

'वापसी' ही कथा अभिराम भडकमकर यांच्या 'चुडैल' या कथासंग्रहातील आहे. नाट्य-चित्रपट हा एक मोठा उद्योग आहे. या उद्योगाच्या मोहक, सुंदर, आकर्षक रूपाचे आणि संपत्तीचे आकर्षण, लहान-मोठ्या, तरुण-वृद्ध अशा अनेकांना आहे. या रूपाला भुलून अनेकजण या मोहमयी दुनियेत येतात. काही मोजके यशस्वी, तर असंख्य अयशस्वी होतात. अशाच या मोहमयी दुनियेत कोल्हापुरातून मुंबईला हिरो बनण्यासाठी गेलेल्या एका मुस्लिम तरुणाची धडपड आणि वैफल्याची कथा आणि व्यथा 'वापसी'मध्ये येते. ही कथा मोहमयी चित्रसृष्टीचे विदारक दर्शन घडवते. सलीम चित्रसृष्टीत उभा राहू शकत नाही. त्याला अपयश येते. हे अपयश स्वीकारून तो आपल्या माणसांत वापसी करू पाहतो. मात्र, सलीमच्या अपयशाचे सावट नातेसंबंधांवर पडते आणि तो मुळापासून उखडला जातो. आपली पाळेमुळे गमावलेल्या आधुनिक समाजाची ही कथा आहे. यात आजवर मराठी साहित्यात अभावानेच आलेल्या 'बागवानी' भाषेचा वापर केला आहे.

'शुभमंगल सावधान...!' ही डॉ. संजय कळमकर यांच्या 'बे एकं बे' या संग्रहातील विनोदी कथा आहे. विवाह हा जीवनातील एक महत्त्वाचा संस्कार आहे. सध्याच्या विवाह सोहळ्यात पारंपरिक रीतिरिवाजांबरोबरच लग्नप्रसिद्धी, लग्नपत्रिका, नवरानवरीचा अतिरेकी मेकअप, डीजेवरील तरुणाईचे थिरकणे, वऱ्हाडी मंडळींची सोशिकता, राजकीय पुढाऱ्यांची सहेतूक हजेरी यांची भर पडलेली आहे. आज विवाहातील मूळ हेतू हे सोपस्कार ठरले आहेत.या सोपस्कारांऐवजी विवाहांमध्ये भव्यदिव्यता, उत्सवी रूप, श्रीमंतीचा बडेजाव, खोटी प्रतिष्ठा व अमाप खर्च यांना महत्त्व आले आहे. या कथेमध्ये विवाहातील

हे सर्व सोपस्कार, त्यातील संगती-विसंगती, गंमतीजंमती प्रत्ययकारीपणे प्रकट झाल्या आहेत. उपरोध, उपहास, शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ विनोदांतून हे कथानक लय पकडते. सर्वांच्याच अनुभवविश्वातील वास्तवतेला विनोदाच्या साहाय्याने कथारूप दिल्याने लग्नविधीतील सत्याचे, पैशांच्या उधळपट्टीतून निर्माण होणाऱ्या समस्यांचे, प्रथा-परंपरांचे कडा आणि कंगोरे उलगडले जातात. मानवी स्वभावातील विसंगती, अज्ञान, प्रसिद्धीचा हव्यास, धूर्तपणा, विक्षिप्तपणा, संधीसाधूपणा यातून साधलेला विनोद कथेची उंची वाढवितो. प्रथमपुरुषी निवेदनातून या आस्था विषयाचे समकालीन वेगळेपण मांडताना लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि नर्मविनोदी शैली ठळकपणे जाणवत राहते.

सचिन वसंत पाटील यांच्या 'अवकाळी विळखा' या कथासंग्रहातील 'कष्टाची भाकरी' ही श्रमप्रतिष्ठा आणि ध्येयवाद जागवणारी व जपणारी कथा आहे. विनायक पाटील या बी.कॉम. पदवीधर तरुणाला खूप प्रयत्न करूनही नोकरी मिळत नाही. त्याच्या वाट्याला मानहानी येते. वडिलोपार्जित शेतीत राबावे लागते. त्याच्याकडे ऊसशेतीमुळे आर्थिक सुबत्ता असते. पण त्याच्या डोक्यात द्राक्षशेतीचे खूळ शिरते. द्राक्षलागवडीनंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी रोगराई, भावातील घसरण, काढणीवेळी आलेला अवकाळी पाऊस यामुळे शेती तोट्यात येते. वाढलेल्या कर्जव्याजामुळे बँकेकडून जप्तीची नोटीस येते. चुलत्याकडे शेती गहाण ठेवूनही प्रश्न सुटत नाहीत. त्यावर पत्नी गवंड्याच्या हाताखाली काम करण्याचा सल्ला देते; पण पदवीधर असल्याने हा सल्ला रुचत नाही. कामधंदा न मिळाल्याने विनायकला पत्नीचे, ''आग लावा तुमच्या शिक्षणाला, काय उपेग तेचा? पैशापुढं तुमचं शिक्षण शून्य.'' हे उद्गार निरुत्तर करतात. तात्काळ पैशाच्या आमिषातून तो व्यसनांच्या आहारी जातो. व्यसनामुळे प्रपंचाची वाताहत होते. निराश विनायक आत्महत्या करू पाहतो. त्यावेळी त्याच्या डोळ्यापुढे कुटुंबाचे चित्र तरळते. हे चित्र त्याला जगण्याचे बळ देते. पश्चातापातून तो कष्टाचा मार्ग निवडतो. व्यसन, दारिद्र्य, कर्ज-बाजारीपणा, दुःख, शोषण, निराशा यावर श्रम, घाम आणि ध्येयाद्वारे मात करता येते. पारंपरिक असो वा आधुनिक शेती असो, बदलते अर्थकारण, अस्मानी व सुलतानी संकटे यामुळे शेतकऱ्यांची उपेक्षा संपत नाही. अशा परिस्थितीत आत्मभान जागे ठेवून श्रम या मूल्याचा दीप प्रज्वलित केल्यास जगण्याचा मार्ग सापडतो, असा संदेश ही कथा देते. या घटनाप्रधान कथेचे प्रवाही कथानक, अर्थपूर्ण शेवट आणि ग्रामीण बोलीमुळे कथेला उंची प्राप्त होते.

अशा या वेगवेगळ्या कथा आहेत. त्यांची ओळख करून घेत असताना

सुरुवातीला आपण कथा या साहित्यप्रकाराची संकल्पना समजून घेतली. कथांचे वेगवेगळे प्रकार, प्रवाह समजून घेतले. त्यानंतर अभ्यासपुस्तकामधील निवडक कथांची ओळख करून घेतली. या कथांच्या निवडीमागे काही उद्देश होते. विद्यार्थ्यांना मराठी विषयाची गोडी लागावी, यासाठी समकालीन जीवन व्यवहाराशी नाते सांगणाऱ्या कथांची निवड केली आहे. त्यासाठी ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरी अशा काही प्रवाहांतील निवडक कथांची निवड केली आहे. त्यामध्ये मराठी कथेच्या वाटचालीमध्ये मानदंड ठरलेल्या काही कथा आहेत. तर काही नव्या कथा आहेत. जुन्या-नव्यांचा हा समन्वय आपल्याला आवडेल असा विश्वास वाटतो.

हे अभ्यासपुस्तक प्रत्यक्षात येत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, मा. उपकुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, मा. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता मा. डॉ. विजय खरे, मराठी अभ्यास मंडळातील सर्व सदस्य आणि उपसमितीतील निमंत्रित तज्ज्ञ, सर्व कथाकार, समीक्षक आणि अक्षरबंध प्रकाशन यांचे सहकार्य लाभले. या सर्व मान्यवरांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

❑ **प्रा. डॉ. शिरीष लांडगे**

❑ **प्रा. डॉ. दिलीप पवार**

❑ **प्रा. डॉ. संदीप सांगळे**